म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९२५८

# गुंजन



REFBK-0008078
REFBK-0008078

सौ. इन्दिरा तेलंग

टे. नं. ४११७९

# नेहमीं कुबलचेच
# ताजे
# मसाले
# वापरा

मेसर्सः—के. टी. कुबल आणि कं. लि.
फोरास रोड, मुंबई नं. ८.

शाखाः—गोलपिठा, लालबाग, परेल,
नायगांव, दादर, ताडदेव, वरळी
व लालबाग मार्केट.

सूचनाः—सातरस्ता विभागांतील लोकांच्या सोयीसाठीं त्या भागांत आम्हीं आमची नवीन शाखा लवकरच सुरू करणार आहोंत.

# गुंजन

( काव्यगीतसंग्रह )

REFBK-0008078

: लेखिका :

सौ. इंदिरा तेलंग

१९५३ ] कुमुद प्रकाशन [ मूल्य रु. १।

- ४ -

मुद्रक
जयराम दिपाजी देसाई
राष्ट्रवैभव प्रिंटींग प्रेस.
मुंबई नं. ४

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

आवृत्ति - पहिली
( १९५३ )

चित्रकर्त्री : सौ. मीरा गायतोंडे

प्रकाशक
कुमुद आणि मंडळी
२ ए रमाप्रसाद, दादी
सेठ रोड, मुंबई ७

## सोळा वर्षांनंतर—

पुन्हां एकदां दिपवाळीच्या मुहूर्तावर हें माझें चौथें साहित्यसुमन प्रकाशित व्हावें हा केवळ योगायोग होय. माझ्या गेल्या तीस वर्षांतील कवितांपैकीं पूर्वार्धांतील बहुसंख्य कविता, माझ्या १९३७ सालीं प्रकाशित झालेल्या 'भावनातरंगां'त संग्रहित कल्या. आतां उत्तरार्धांतील भावनांचा संसार या 'गुंजनां'त थाटण्याचा प्रयत्न केला आहे. याला काव्यगीत-संग्रह म्हणतांना यांतील 'काव्य' कबूल वा नाकबूल करणें, रसिकांवर अवलंबून ठेवलें आहे. परंतु त्यांतून गीत मात्र नक्कीच झंकारेल, अशी माझी संगीतकारांना पूर्ण ग्वाही आहे.

रेडिओवरील भावगीतकारांची कुचंबणा पाहून व काव्यवाचनाची उत्तरोत्तर वृद्धिंगत होणारी उपेक्षा लक्षांत येऊनच मी माझा भावनाविष्कार संगीतांत करण्याचा प्रयत्न केला आहे. सिनेमासंगीताची लोकप्रियता जरी या गीतांना साधली नाहीं, निदान स्नानगृहगायकांची मेहेरनजर, या गीतांकडे वळली, तरी पुरे आहे. या दृष्टीनें या कवितांच्या चाली सुलभ आणि लवचिक ठेवण्यांत आल्या आहेत. यांपैकीं कांहीं गीतें आठ दहा वर्षांपूर्वीं विविध कालिकांतून प्रसिद्ध झालीं आहेत. पण बरीचशीं अप्रसिद्ध असून 'भावमाला, नलिनी, लालीचें प्रश्नचिन्ह' या केवळ कविताच आहेत. या संग्रहाचें बहिरंग सजविण्यांत माझी प्रिय कन्या, सौ. मीरा गायतोंडे, श्री. नागेश. ग. पिकळे आणि जाहिरातदार, यांनीं केलेल्या अमोल साहाय्याचा इथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. त्यांतच श्री. देसाई यांनीं ज्या आपुलकीनें या संग्रहाचें मुद्रण केलें, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच. तसेंच सुबक छपाईबद्दल 'राष्ट्रवैभव' छापखान्याला धन्यवाद देतें. या गुंजनाच्या ललकाऱ्यांनी थोडा वेळ जरी सिनेमासंगीताला स्नानगृहांतून विश्रान्ति मिळाली, आणि एखाद्या हृदयांत जरी भावनेची पणती उजळली, तरी मी स्वतःला धन्य समजेन. आणि पुन्हा एकदां 'भावभक्तीने बांधीलें । भावगीतांचें तोरण । वर शोभे दीपमाळ । त्यांत माझें नीरांजन ॥ असें म्हणून हें माझें 'गुंजन' मीं शारदेच्या दीपमाळेंत ठेऊन देतें. तिच्या ज्योतीनें एखादी तरी ज्योत उजळो, एवढेच 'शारदे'कडे मागणारी,

सौ. इंदिरा तेलंग

६-११-५३

७८९४१ अनुक्र. कां. ३१०७ विभाग ९२८५ ३।८।७



Thanks to
KAMINIA
IDEAL HAIR TONIC,
COOL, REFRESHING.
KAMINIA
HAIR OIL



# पर्ल काढा

## अंगातील असह्य उष्णता
## कमी करण्यासाठीं

सर्व अंगाची डोळ्यांची, हातपायांच्या तळव्यांची, लघवीची असह्य जळजळ, नेहमीचे अग्निमांद्य, जुनाट अपचन व मलावरोध, वीर्यक्षीणता, शारीरिक व मानसिक थकवा वगैरे ऊष्ण प्रकृतिमुळें होणाऱ्या विकारांवर अप्रतिम.



# अबलामृत

## स्त्रियांना तारुण्य. सौंदर्य शक्ति
## परत मिळवून देणारे

स्त्रियांची शक्ति, सौंदर्य, तारुण्य नष्ट करणारे प्रदर ( पांढरा व तांबडा ), बाळंत विकार, गर्भाशयाचा अशक्तपणा, पाठ, कंबर, पाय वळणें, असह्य फुटाफूट होणें, मासिक पाळीचे सर्व तऱ्हेचे त्रास वगैरे विकारांवर अबलामृत अनुभवानें गुणकारी ठरलें आहे.

*आपल्या केमिस्टकडे मागा!*

**पर्ल कंपनी, राणीबाग, मुंबई २७**

Estd. 1927 Tel. 31652

# Rashtriya Hindu Bakery

**Our Products are approved**

*by*

**All People in Bombay**

*&*

**Hence Demanded by**

## ALL MILLS & WORKSHOPS CANTEENS

*Vita Bread*

*a*

*Speciality*

Address :

43, Sonapur Lane, Bombay 2.

SHOPS

**1, Kelewadi Corner, GIRGAUM.**

**2, Sarswati Nivas, THAKURDWAR.**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | परकर कीं फुलवून ... | १ |
| २ | सागरगीत ... ... ... | २ |
| ३ | स्वागत ... ... ... | ३ |
| ४ | पहाट वारा ... ... ... | ३ |
| ५ | गोड पापा ... ... ... | ४ |
| ६ | तीळ गुळ ... ... ... | ४ |
| ७ | मंजुळ बोला ... ... | ५ |
| ८ | दीपावलि ... ... ... | ६ |
| ९ | लूट .... ... ... ... | ६ |
| १० | माझी प्रीत ... ... ... | ८ |
| ११ | तक्रार ... ... ... | ८ |
| १२ | खचित हां उद्यां ... | ९ |
| १३ | होती तूं खिडकींत उभी ... | १० |
| १४ | आशा ... ... ... | ११ |
| १५ | विरस ... ... ... | १२ |
| १६ | सांज फुलतां ... ... | १३ |
| १७ | पूर्तीचें हंसन ... ... | १४ |
| १८ | कांटेरी वलयें ... ... | १५ |
| १९ | सुवर्णपथ ... ... | १६ |
| २० | शुभाचतन ... ... | १७ |
| २१ | तिळगुळ ... ... ... | १८ |
| २२ | चंदेरी दरिया ... ... | १९ |
| २३ | तुलना ... ... ... | २० |
| २४ | चालतां मी एकटी ... | २२ |
| २५ | निरोप ... ... ... | २३ |
| २६ | तूं माझी ... ... ... | २४ |
| २७ | तारखेस ... ... ... | २५ |
| २८ | सोनेरी हांक .... ... | २६ |
| २९ | आई ... ... ... | २७ |
| ३० | प्रीतीची रीत ... ... | २८ |
| ३१ | आहे उभी मी क्यूमध्यें ... | २९ |
| ३२ | उघड गुपित ... ... | ३० |
| ३३ | भावमाला ... ... ... | ३१ |
| ३४ | तिळगुळ ... ... ... | ३८ |
| ३५ | घरणीचें स्वप्न ... ... | ३९ |
| ३६ | लालीचें प्रश्नचिन्ह ... ... | ४१ |
| ३८ | तूं आंत आणि बाहेर ... | ४३ |
| ३८ | तीरावर नांगरलेल्या पडावास | ४४ |
| ३९ | याचना ... ... ... | ४५ |
| ४० | हृदयिची आशा ... | ४६ |
| ४१ | नलिनी ... ... ... | ४७ |
| ४२ | स्वागत गीत ... ... | ५२ |
| ४३ | शीण ... ... ... | ५३ |
| ४४ | जा खुशाल दगड बनून ... | ५४ |
| ४५ | वरदान .... ... ... | ५५ |
| ४६ | देवाच्या राऊळांत ... | ५६ |
| ४७ | समांतर जीवन .... .... | ५७ |
| ४८ | प्रतीक्षा ... ... ... | ५८ |
| ४९ | उत्तर ... ... ... | ५९ |
| ५० | दिवाळी दिवाळी आऽलीऽ | ६१ |
| ५१ | फोल संसार ... .... | ६२ |
| ५२ | तिची आकांक्षा ... ... | ६३ |
| ५३ | सरवीस ... ... ... | ६४ |
| ५४ | वंदन ... ... ... | ६५ |
| ५५ | प्रीतीचा 'क्ष' ... ... | ६५ |
| ५६ | प्रेमाचे रीण .... ... | ६६ |
| ५७ | मधु आशांसह ... ... | ६७ |
| ५८ | कलेचें अर्चन ... ... | ६८ |

चि. इनास,



स्वर्गावरुनी

येई उतरुनि

अमर 'गुंजनीं'

पाउल झंकारून ॥ चिमुकला ॥

परकर कीं फुलवून ॥

## १ परकर कीं फुलवून.

( भीमपलास )

पायीं पैंजण
वाजति रुणझुण
नाचसि हर्षुन
घेसी मन मोहून
चिमकुला परकर तव फुलवून ॥ धृ० ॥

अर्धोन्मीलित
कलिका हंसवित
जाई मारुत
पुष्पदलें उघडून
चिमकुला परकर कीं फुलवून ॥

पुष्पांवरती
पतंग बसती
हर्षे उडती
पंखचि वा उघडून
चिमकुला परकर कीं फुलवून ॥

समईवरती
वाऱ्यासह ती
डोलत ज्योती
छायेसह नाचून
चिमकुला परकर कीं फुलवून

* * *



१५०२१७ ९२५०७ २८/१९२५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे प्र. क्र. C.O.G.

## २ सागरगीत.

( तुज मी शरण अजिमाफ–मानापमान )

या ग या
चला जाऊं चला पाहूं
सागराच्या सवें गावूं ॥
पहाटेचा शीत वारा
स्पर्शतां ये शिरशिरी
अनुभवाची माधुरी
चला घेऊं ॥
लाट जाईं फिरुनि येईं
आपटे पायांवरी
मौक्तिकांच्या तुषारीं
चला नाहूं ॥
खोंचुनीयां पदर ओचे
उंच व्हा बोटांवरी
नाचणाऱ्या सागरीं
उडी घेऊं ॥
अंबरीं या नीलशा
विहरती वाऱ्यावरी
धांवत्या मेघांपरी
चला पोहूं ॥

पसरुनीयां पंख दोन्ही
चाखितो गतिमाधुरी
डोलत्या गरुडापरी
हात मारूं ॥
वाढवूंया वर्तुळें
नाचत्या लाटांवरी
पर्वताच्या गव्हरीं
साद जेवीं ॥
तांबडें फुटतां नभीं
दूरच्या क्षितिजावरी
ये उषा कीं लाजरी
चला पाहूं ॥
उजळल्या ना दशदिशा
जाग ये विहगांतरीं
सोनियाच्या रविकरीं
पूत होऊं ॥
या ग या
चला जाऊं
चला पाहूं
सागराच्या सवें गावूं ॥

* * *

## ३ स्वागत.

(उघड दार)

उजळुं दीप उजळुं दीप स्वागतार्थ आपुल्या ॥ ध्रु० ॥

सूज्ञ आजच्या सभेंत रसिकभृंग पातले ।
आळवुनी रम्यगीत गोड उधळुंया फुलें ॥
क्लांत श्रांत जीवनांत दिव्य चेतना स्फुरो ।
हांसवुनी कणकणां क्षणक्षणांस जागवो ॥
प्रार्थुं रंगदेवतेस विनवुं रसिकपाउलां ।
न्याहळुनी कार्यज्योत विसर न्यूनसांवल्या ॥

* * *

## ४ पहाटवारा.

कळी हंसविली फुलें फुलविलीं। सळसळ पानें वाजविलीं ॥
घरट्यांतिल कीं सान चिमुकलीं। पिलें चिमणिचीं जागविलीं ॥
पडे अंगणीं सडा फुलांचा
लाल पांढरा प्राजक्तीचा
माणिकमोत्यांची कीं माला । ओघळुनी बाई टाकियली ॥
सूर्याची किरणें सोनेरी
लपवित होती पूर्वा पदरीं
खट्याळ मारुत पदरा उडवित। जगावरी मग कोसळलीं ॥
हळू दगांची पुसुनी लाली
युवतींच्या लावियली गालीं
गोड शिरशिरी प्रभातकाळीं । नयनांतुन मग सांडियली ॥



* * *

## ५ गोड पापा.

गोड गोड किति गोड बाई ।
पुरे गडे ना सोड आई ॥
नयन चमकती
गुलाब फुलती ।
भ्रमर गुंजती भालांवरती
ओंठाच्या पाकळ्या विलगती
चाखूं दे मध गोड बाई ॥ १ ॥

* * *

## ६ तिळगुळ.

झालेंहि विश्व श्रांत । आली निशाहि शांत ।
या झोंपल्या जगांत । मी एकलीच भ्रांत ॥
वाटे मनास माझ्या । मनसोक्त गान गावें ।
पडसाद गोड त्याचे । तव अंतरीं घुमावे ॥
संक्रान्त आज आली । तूं दूर राहशील ।
सांगू कुणास आतां । घे तीळ गोड बोला ॥
सर्वस्वदान देतां । द्याया नुरेच कांहीं ।
देई कुणास कोण । तूं मी न भेद राही ॥
माया परी ग खोटी । खोटेंच बोलवीतें ।
मधुबोल मागण्यातें । तिळगूळ पाठवीतें ॥

* * *

## ७ मंजुळ बोला.

लेवुनी प्रीतिचीं सुमनें
संध्या ये आनंदानें
तारांचीं गगनीं कवनें
उधळीत वदे सूर्याला ।
तिळगुळ घ्या
मंजुळ बोला ॥

वृक्षलता पुष्पें फुलती
मारुतासवें तीं डुलती
निजसुगंध अखिलहि जगतीं
उधळीत वदति सृष्टीला ।
तिळगुळ घ्या
मंजुळ बोला ॥

शशिनाथ सुधेचा तारा
रजनीचा जिवलग प्यारा
हृदयींच्या मधुवचधारा
ओतीत वदे रजनीला ।
तिळगुळ घ्या
मंजुळ बोला ॥

मग साधी भोळीं पानें
मूकशा प्रेमभावानें
अश्रूंचीं करुनी वचनें
विनवीत अखिल विश्वाला ।
तिळगुळ घ्या
मंजुळ बोला ॥

वनसृष्टीचे वेल्हाळ
वसुधेचे अल्लड बाळ
निज तुषार उधळित सकळ
सांगती गडे विश्वाला ।
तिळगुळ घ्या
मंजुळ बोला ॥

विश्वाचा बघुनी साज
हृदयातें वाटे लाज
त्यांपुढती कैसें आज
ऐकाल गडे मम बोला ।
तिळगुळ घ्या
मंजुळ बोला ॥

प्रेममुग्ध वेड्या हृदयीं
आशा परि गाणें गाई
शंका मग झोंपी जाई
झंकार उठवि हृदयाला ।
तिळगुळ घ्या
मंजुळ बोला ॥

* * *

## ८ दीपावलि.

मातीच्या पणत्या होत्या केव्हांच्या पडल्या
अडगळ आवरतां अवचित तिजला सांपडल्या
स्नेहाचें तेल घालुनि स्फूर्तीची वात
हौसेनें गृहिणी पेटवी कार्याची ज्योत
दाराच्या पुढती ठेवी सुरेख ओळीने
पेटवितां पणत्या झालें मातीचें सोने
दीपावलि आली लागल्या दीपांच्या ओळी
हर्षाच्या लहरी पळविती आंब्यांचीं जाळीं

* * *

## ९ लूट.

लुटा या तिळगुळ हा मम खास !
दिलाच नाहीं, देत कुणीही, आजवरि न कोणास ॥ धृ० ॥
स्नेहाचे क्षण जगवी जीवन स्नेहाचा निःश्वास ।
आयुष्याच्या नव मार्गावर देई बालमना विश्वास ॥
प्रीतीचे क्षण फुलवी जीवन प्रीतीचा निःश्वास !
खळबळत्या पाण्यांतुनि नौका नेई सांवरुनी तोलास॰॥
कर्तव्याचे कांटेरी क्षण कुंपण सुखधामास ।
त्यागावांचुन पूर्ण न जीवन देई आश्वासन जीवास ॥
शोधुनि जीवन वेंचुनिया क्षण सौख्याचे निःश्वास ।
मधुसुररंगित मधुशब्दांकित, लुटा या, तिळगुळ हा मम खास ॥

* * *

## १० माझी प्रीत.

मी कशी तुझ्यावर करतें सांगू प्रीत
जणुं निरभ्र चंद्रावरी चांदणी रात
पुष्पाचें फुलणें जेविं पसरवी वास
ये सागरलाटां झोंके घेतां फेस
तो निर्झर वाहे झुळझुळ गाणीं गात
कांठाशीं खेळे लाडिक वळणें घेत
परि कडा संपतां उडी खालतीं घेई
नच मागें पाही तेवीं मम प्रीतीही
घनदाट अंबरीं कडकडली जों वीज
पाऊस कोसळे अंधाराचें राज्य
कांपली धरित्री हर्षें रोमांचीत
हिरव्यांतुन हांसे तेवीं माझी प्रीत
तूं सूर्य गडे अन् ग्रहमाला मम प्रीती
तूं अढळ जोंवरी ढळणें शक्य नसे ती

★

## ११ तक्रार.

कां जातां जातां वळलासी माघारी
कां केलिस मजसी हंसावयाची चोरी
कां नजर चोरटी होती धुंडाळीत
बोलण्या विषय ना झाला कीं चाळींत
जरि फूल लाविशी सहज गडे कोटास
साशंक बघति माझिया रिञ्या वेणीस
नाहींच वाट रेशीम सुईंत ओंवाया
प्रश्नांकित नयनीं हंसति चोरट्या छाया
जरि हळुच वाजलें जिन्यावरी पाऊल
लागते कळेना कशी जगा चाहूल
नाहींच धीर मज बघण्या डोकावून
येईल खोकला शेजारीं उसळून
कां उगा पसरिलें प्रीतीचें साम्राज्य
जरि नव्हतें तुजला करावयाचें राज्य

* * *

## १२ खचित हां उद्यां !!

लिहिलें कां पत्र घरीं ?
    खचित हां उद्यां !
दिधलें कां बील तरी ?
    खचित हां उद्यां !
पाहुनि ये आजारी
    खचित हां उद्यां !
मित्रांचें आठवणें
पत्नीचें कीं रुसणें
मातेचें कुरकुरणें
सांगुनियां बंद करी
    खचित हां उद्यां !
घेतलात रेनकोट ?
    खचित हां उद्यां !
दिधली शिवण्यास पँट ?
    खचित हां उद्यां !
सांगुनियां येत वीट
    खचित हां उद्यां !
भेटलास नानाला ?
वेळ मुळीं नच उरला
वैशाखहि बघ सरला
रागानें उत्तरलों !
    खचित हां उद्यां !
रोजचेंच हें उत्तर
    खचित हां उद्यां !
पाहिलास कां डॉक्टर ?
    खचित हां उद्यां !
पडला कां आज विसर
    खचित हां उद्यां !
गतसंधी ये न फिरुनी
गंहिवरतो आठवुनी
विरले जे बेत मनीं
ठेवी करणार म्हणुनी
    खचित जे उद्यां !

* * *

## १३ होती तूं खिडकींत उभी.

(मालगुंजी–त्रिताल)

नजर खिळवुनी उंच नभीं
होती तूं खिडकींत उभी ॥ धृ० ॥
विलसे हास्य मुखावरती
कुंदकळ्या जणु कीं फुलती
चांदण्याच वा लुकलुकती
अथवा बिजली काय नभीं । होती तूं खिडकींत उभी ॥
काळ्या केसांचें चाक
बकुळीचा सर दे वांक
ढगास झालर चंदेरी
लाटेवरचा फेस तरी
फुलाआडची कीं भ्रमरी
चंद्राची वा कोर नभीं । होती तूं खिडकींत उभी ॥
गालावरची गोड खळी
तीळ चिमुकला मीन जळीं
आकर्षण हृदयास अती
भावनांस येई भरती
पदर उडे वाऱ्यावरती
चंडोलचि कीं उंच नभीं । तेवीं तूं खिडकींत उभी ॥
शीळ घातली हळूचशी
दचकुनियां घे नजर उशी
जरा पाहसी वांकून
काळा सर पदरांतून
सांगे मज उपहासून
तुझी तारका दूर नभीं । राहि जरी खिडकींत उभी ॥

* * *

## १४ आशा.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

पानांफुलांत हांसे भ्रमरांसवें वसंत
नादावुनी नभातें नाचे विहंगगीतें
सृष्टींत ये उबारा अन् गोडवा मनातें
तूंही खुल्या दिलानें दिधलेंस प्रेम मातें
अंधार दाटलासे गरजे नभांत वीज
साशंक वाट पाही कधिं अंकुरेल बीज
नभ कोसळे जणूं कीं न दिसेच पैलतीर
थरकांपल्या मनाला दिधला तुवांच धीर
डुलती उन्हांत शेतें विभवास शीग लागे
बरसात मौक्तिकांची भरण्यांत जीव भागे
उरलीच ना मनीषा नुरला जिवास चाळा
सहभागिजीवनाचा झाला अतां हिंवाळा
सृष्टी उदास सारी ध्येयास शून्यताही
चिंता मनांत माझ्या अन् खिन्नता तुझ्याही
झोंबे भणाभणा हा जीवास शीत वारा
आंचेस हा भुकेला नाहीं कुठें निवारा
फुलते मनांत आशा जाईल हाहि काळ
जरि अंतरीं तुझ्याही स्फुरतील गोड बोल ॥

* * *

## १५ विरस !

प्राजक्तीखालीं बसतां जाऊन मग
एकलेपणाची विझुनी जाई धग
चंदेरी लाटा होत्या तईं नाचत
पानांच्या छाया वरुनी झोकावत
ये वारा हांसत उठवी झोंपेतुन
एकाकी लतिका पाही डोकावुन
पाहिलें गुलाबी स्वप्नचि जणुं क्षणभरी
अस्फुटशी कलिका पानांतुन हांसरी
तोडिली कळी अन् हौसेने जाउन
दारांत भेटतां धरिलें तुज अडवुन
'हें फूल लाविंतें थांब जरा क्षणभरी'
म्हणशी 'मज गेली कोटाची इस्तरी'
ढाळुनी आसवें जगतें आशेवर
फुलणार कधीं तव प्रीतीला मोहर ?

* * *

## १६ सांज फुलतां.

सांज फुलतां आभाळीं
आल्या तारका गोठ्यांत
पायधूळ उधळीत
खुले ढगांवर लाली ॥
सांज फुलतां आभाळीं
खग आले घरट्यांत
चिमण्यांचें हर्षगीत
निनादलें हो अंतराळीं ॥
सांज फुलतां आभाळीं
पश्चिमेच्या तबकांत
चांदण्याची सांजवात
शशिरायातें ओवाळी ॥
सांज फुलतां आभाळांत
रंग खुले लाल लाल
हृदयाची हालचाल
उजळीत प्रेमज्योत ॥
सांज फुलतां आभाळांत
आस फुले हृदयांत
शुभ ज्योत जीवनांत
गाई मांगल्याचें गीत ॥

* * *

## १७ पूर्तीचें हंसन.

उघडिं नयन । उघडिं नयन । अधिर सृष्टि झाली ।
सेवेस्तव, तुज अजुनी जाग कशि न आली ॥ धृ० ॥

सोनेरी नव किरणें
ज्ञानाचीं अवतरणें
विद्येचीं आभरणें
नाचति तव भाळीं ॥

गुंजारव रसिकांचा
मधुसुगंध सु–मनांचा
हर्ष नाद विहगांचा
घुमत अंतराळीं ॥

समतेचीं नव कुरणें
सरितांचें झुळझुळणें
छायांचीं आवरणें
अधिर पहा झालीं ॥

ऊठ आतां उघडिं नयन । विकसो तव हृदयसुमन
पूर्तीचें गोड हंसन । विलसो तव गालीं ॥

* * *

मग हांसत वदलें देउनियां तुज तिळ
'तिळगुळ घे आणि बोल गडे मंजुळ'
क्षण एक पाहशी निरखुनियां तिळगुळा
किति गोड अपेक्षा हृदया दे गुदगुल्या
परि तत्वाचा अभिमान येई उसळुन
परदेशी साखर देशी मज परतुन
सांचलीं आंसवें गालांवर ओहळ
ओघळतां म्हणशी हेच मला प्रिय तिळ
ओठांनीं पुसतां म्हणशी 'वेडी कशी'
हृदयांत बगीचा हर्षाचा फुलविशी
आजही कुठेंही टाकिशि तूं तिळगुळ
परि कुठें आंसवें पुसण्याची तळमळ
गुदमरे भावना स्मृती तयांची परी
कांटेरी वलयें फुलवी हृदयांतरीं

* * *

## १९ सुवर्णपथ.

जीवनपथ श्रमिकांचा ।
आशेविण शुष्क ओंठ
बघुनि शिणलीच दीठ
आळवितां सुकत कंठ
ओलावा आंसूचा ॥ धृ० ॥
अंधारीं क्रमितां पथ
मालवली ज्ञान ज्योत
कदम कदम ठेंचाळत
हास्य विषय जगताचा ॥
कोमलता बंदिवान
सौंदर्यांतून खून
मानवता हो मशीन
भरडा मग भावांचा ॥

नादावत अंतराल
श्रमिकांचा कोलाहल
परजीवी पुष्ट सकल
बसवुनियां कानठळ्या ॥
क्रान्तीची आज वेळ
प्रीतीचे हे तिळगुळ
उधळुनियां जगतिं अखिल
जगवुं खास मानवता ॥
बंधुभाव हो जाग्रत
कर्तव्या जागवोत
कष्टांची हो किंमत
उजळो पथ सोन्याचा ॥

* * *

## २० शुभचिंतन.

( नाथ कधिं येतिल गे मंदिरीं )

पातला नववर्षाचा दिन
    पाठवूं कसलें शुभचिंतन ॥

धांवल्या मेघांची मालिका
लपविते पुनवेची चंद्रिका
प्रकाशित होय जणूं पत्रिका
    वाचतां येईल शब्दांविण ॥

खेळतां लाटांच्या भोंवतीं
आठवी शिखरांची संगती
धांवतां हंसवी पुष्पांप्रती
    मारुता फुलव सखीचें मन ॥

नीलशा अथांग नभसागरीं
विहरतां थांब जरा क्षणभरी
पांखरा सखिच्या सज्जावरी
    गुपित मम हृदयांतिल उघडुन ॥

उषा करूं नेत्रांचें स्वागत
गोड वच श्रवणीं अभ्यागत
ओंठ मधु हास्यानें विकसित
    हृदय करूं आनंदें स्पंदन ॥
    सखी तुज पाठवि शुभचिंतन ॥

* * *

## २१ तिळगूळ.

नाहींच मी कुणाला तिळगूळ वाटणार
नाहींच मी कुणाशीं तिळगूळ याचणार
तिळगूळ घेउनियां मधुबोल कां वदावे
डाळिंब पाहुनीयां शुकबोल कीं घुमावे
हृदयांत प्रेम दाटे तरि गोड बोल येती
कटुबोल तेहि प्रेमी जीवास गोड होती
हृदयांत प्रेम आटे तरि गोड गोड बोला
ऐकोनि ऊर फांटे बरवा गमे अबोला
नाहींच मी कुणाला तिळगूळ देत खास
धरिशी जरी अबोला तरि एकदांच हांस
गतगोडशा स्मृतींनी गुंफोनि काव्यमाला
अर्पीन प्रेमभावें रुसल्या गडे जिवाला

१४-१-३८

* * *

## २२ चंदेरी दरिया पसरला.

चंदेरी दरिया पसरला। हांसत नाचत। मोतीं
उधळित। अरुण राग हृदयांत विकसला ॥ धृ० ॥

तरंगत होतें कुसुम चिमुकलें।
विशालतेवर घेईं झोले।
अहंकारलाटांसह डोले।
क्षणांत दल दल कीं विखुरलें ॥

अनंततेवरि तेंवीं जीवन
अनुभव झोले घेईं निशिदिनीं
कुसुमासम नच जावो विखरुन
अरुण राग सम हो विलीन ॥

* * *

## २३ तुलना.

कां उगाच तुलना करिशी माझी अशी ।
कां उगाच हृदया माझ्या तूं दुखविशी ॥
मार्गांत चालतां पडतें ठेंचाळुन ।
कां व्यर्थ पसरिशी कांटे वाटेंतुन ॥
नाहींस दिलें तूं मजला आश्वासन ।
आधारास्तव, अन् धरली मी आस न ॥
एकाकी आलें एकलीच जाइन ।
लागतां ठेंच तूं पाहिं न उपहासुन ॥
पुरविल्या न मी आकांक्षा तव प्रियकरा ।
रुजविलें मनीं तव तसें न प्रेमांकुरा ।
तव आनंदाची सृष्टी फुलवावया ।
असमर्थ जाहलें आलें मज कळुनियां ॥
आनंदें माझ्या होशि न आनंदित ।
दुःखें वा माझ्या हृदीं न तूं दुःखित ॥
मानसीं तुझ्या या नुरल्या संवेदना ।
भावना–भिन्नता ना दे मज वेदना ॥
नाहींस दिली तूं प्रीतीची ओळख ।
नाहींच कधीं आपुलकी तुज ठाउक ॥
जगिं कुणी हिरवळीवरी हंसत चालत ।
अन् कुणीं फत्तरी मार्गीं ठेंचाळत ॥
प्रगतीस्तव धडपड परस्परांची परी ।
पाऊल पुढें, मी प्रसन्न हृदयांतरी ॥

परि उपहासाचा कांटा पायीं रुते।
प्रगतीची धडपड सारी थंडावते॥
ना जरी साउली प्रीतीची अंतरा।
तूं नको आटवूं कर्तव्याचा झरा॥
गौरवीं जगाच्या होवो मम विस्मृती।
आनंदें साहिन नाहीं मजला क्षिती॥
परि अभिमानें, तुज शीर उंच ठेऊन।
वावरतां, डोळे भरुनी मी पाहिन॥
भोंवती पसरिना चंद्रासम चांदणें।
म्हणुनी उपहासें दीप कशा फुंकणें॥
काळोख सभोतीं माझ्या आणिक तुझ्या।
बघुनी तीं संशय–भूतें करिती मजा।
रसिकानें खुडिलें फूल लतेचें तरी।
वृक्षानें झुरणें काय फुका अंतरीं॥
येईल कुणीही तयास शोधावया।
पर्णानीं उघडी कुटिका झांकावया।
परि उपहासाचें वादळ होतां सुरू।
सृष्टींत लता वा तरु न देई उरुं॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८०७८

## २४ चालतां मी एकटी.

चालतां मी एकटी
वाट कीं संपेच ना
संपुनी संपेच ना
चालतें जैं एकटी ॥

टाकितां जड पाऊल
पावते कीं प्रसरणा
संपुनी संपेचना
वाट आणी वेळ ही॥

पाहतां नजरेपुढें
चालती युग्में किती
मीच बाई एकटी
बोंचतें माझ्या उरा ॥

सारखी घे चाहुल
वाजतां कीं पाऊल
उसळती हृदयांतिल
अधिरतेच्या यातना॥

चालली कोणी तरी
बालका धरुनी करीं
हुरहुरे मी अंतरीं
हात माझा मोकळा॥

तारका गगनांतल्या
पाहुनी उपहांसती
चालतें मी एकटी
चंद्र त्यांचा सोबती॥

उजळल्या दीपांतुनी
हळुहळु ये शर्वरी
आस वाटे मज परी
अजुनिही येशील तूं॥

* * *

## २५ निरोप.

राग–जोगी

निरोप द्यावा शेवटचा मातें। येतें।
जरि भेट पुन्हां
रुचलीच मना
भेटूं तेथें ॥ धृ ॥

नुरतील जिथें मतभेद गडे
कोणाविण ना कोणीच अडे
जैं प्रीतिपथीं रुपती न खडे
भेटूं तेथें ॥

नाहींच जिथें भिजण्यास उशी
लपवून नको रडण्यास कुशी
गुंफीन आंसवें उघडनिशी
भेटूं तेथें ॥

नसणार कुणी विष फुंकरण्या
नच जादुगिरी मन मोहविण्या
हृदया न कुशंका पोखरण्या
भेटूं तेथें ॥

नाहींच कलेचें स्तोम जिथें
नाहींच मना फसवणुक तिथें
प्रीतीस्तव प्रीती कीं जगते
भेटूं तेथें ॥

खेळांत भागतां बाळ हरे
बावरुनी घरट्यांत फिरे
मायेच्या पंखांत शिरे
भेटूं तेवीं ॥

नसणार प्रकाशा जैं छाया।
विश्वाची नुरलि जिथें माया
मजवीण दुजी ओढ न हृदया
भेटूं तेथें ॥

* * *

## २६ तूं माझी.

तूं माझी। तूं माझी। माझीच सखे। तूं माझी॥
परि नव्हे तुझा मी। अससि जरी तूं माझी॥

तूं पतंग मी दोरा
उडवीत तुला वारा
गगनांत फुलत तोरा
मी येइन तुजसह विहरायातें सहजी। तूं माझी।

तूं उंच नभीं डोल
पाडीत जगा भूल
हंसरेंच जणूं फूल
मी कुठें अडकतां खेंचिन तुज परि सहजी। तूं माझी।

गिरकतां गोल गोल
जाईल जरी तोल
आधार तुझा फोल
तूं जाशिल फाटुन सोडिन मी तुज सहजी। जरी माझी।

* * *

## २७ तारखेस.

तिळगुळ घे अन् गोड बोल ।
मी बोलूं आज कुठून ।
तारखे येईं तूं परतून ॥ धृ० ॥

रुसवा फुगवा आणि अबोला
भाषा आशातुर हृदयाला
निराश अमवास्यारजनीला
संध्याराग कुठून ॥

नभीं फिरे हा सुसाट वारा
लतातरूंना नुरेच थारा
धूळच सारी त्यांत फुलोरा
डुलेल बाई कुठून ॥

येईं करुनी सार्थ नाम तव
स्वातंत्र्याची पहाट अभिनव
आबादीचें येवो वैभव
तोंवरि वरितें मौन ।
तारखे येईं तूं परतून ॥

१४-१-४४

* * *

येतां घनपाशांतुन
सोनेरी हांक करुण
झरझर सर अवतरली
अवनितला जाग ॥

शेताच्या कोन्यांतुन
बीजें होतींच दोन
टप टप रव ऐकुनियां
येत तयां जाग ॥

जागृतिचा ये अंकुर
नयनयुगुल आशातुर
पर्णद्वय करिं स्वागत
उघडुनियां दार ॥

भूस्वर्गा हो मीलन
पर्णांची कीं पखरण
कणकण मग कणसांतुन
हरपित शिणभाग

मानवते हो जागृत
घेइं गडे सेवाव्रत
बघ बघ जग आक्रंदत
मानवते जाग ॥

* * *

## २९ आई.

थोर थोर किति थोर आई ।
तुझी थोरवी विश्वहि गाई ।।ध्रु०।।

झुळझुळ वाहत ये निर्झरणी
सळसळ पानें लतिकांवरुनी
किलबिल घरट्या घरट्यामधुनी
आळविती तुजलाच आई ।।

काळोखांतिल बाई बागुल
उदासीनता आयुष्यांतिल
भेडसावितां मज पांघरशिल
पदर फाटका तरी पुरे ही ।।

ठेंचाळुन वाटेवर पडतां
अथवा पायीं मोडे कांटा
सदा निराशा हृदयीं सलतां
पुरे मुका तव ओझरता ही ।।

स्पर्शांतिल तव जादू न्यारी
दुखणीं बाणीं पळतीं सारीं
शीणभार हृदयाचा उतरी
जरी हडकुळी कुशी तुझी ही ।।

लंधुनि जाऊं संकट सिंधू
पंचमहाभूतांची जादू
परी तुझ्या अश्रूचा बिंदू
तरू शकेना मुळीं कुणीही ।।

तुझ्याच मायेवरती जगला
तुझ्याच गानें अमर जाहला
गिरकी घेतां जरी विसरला
झोंपी तव अंकींच जाई ।।

दुबळ्या जीवा पाजिसि प्रीती
तरुण मनांना देशी स्फूर्ती
दमल्या विश्वातें विश्रान्ती
फेड तुला कसलीच नाही ।।

* * *

## ३० प्रीतीची रीत.

सोडितोंच नाव जरा
लहरींचा बघ नखरा
सुटला जरि कां वारा ?
फार तूं कुशंकी ।
प्रीतीची रीत अशी सदा पापशंकी ॥

आंदोलन गोड किती
झोके हे मोहविती
पाणी परि खोल अती !
उगिच तूं कुशंकी
प्रीतीची रीत अशी सदा पापशंकी ॥

कांटेरी वेलीवर
फुललें हें फुल सुंदर
काढितोंच बघ सत्वर
जाइल ना तोल कीं
प्रीतीचा विरस असा करिशि तूं कुशंकी ॥

धाडस तव हृदयाचें
पाहुन कौतुक नाचे
लटक्या परि कोपवचें
दुखवितें तुला कीं
प्रीतीची रीत अशी सदा पापशंकी ॥

* * *

## ३१ आहे उभी मी क्यूमधें ।

आहे उभी मी क्यूमधें
घेऊनियां झोळी करीं
लाभेल या आशेवरी
गूळ किंवा साखर ॥

आहे उभी मी क्यूमधें
झोळींत नाहीं दीनता
ओळींत आहे सभ्यता
हें तिष्ठणें श्रद्धेवरी ॥

आहे उभी मी क्यूमधें
ग्रीष्मीं उन्हाची तीव्रता
वर्षाऋतूची आर्द्रता
पर्वा न त्याची अंतरीं ॥

आहे उभी मी क्यूमधें
देईन केव्हां तिळगुळ
घेईन बोल प्रेमळ
आशा धरोनी ही उरीं ॥

आहे उभी मी क्यूमधें
आशा मनोरे बांधते
शून्यीं पसारा पाहते
पायांतली ये साउली ॥

आहे उभी मो तोंवरी
उघडेल दार झांकलें
मिटल्या कळीची हो फुलें
कमळांतल्या मधुपापरी ॥ आहे उभी मी तोंवरी ॥

१९५१



* * *

## ३२ उघड गुपित.

सृष्टीचें उघड गुपित ।
वरि विरोध मीलन आंत ॥

अघटित हें । परि राहे ।
सान्तांत भरून अनन्त ॥

इवल्याशा नयनांतून
जग राही सामावून
अघटित हें । नित्य घडे ।
थोराहून थोरचि सान ॥

चंद्रमा नभीं किति दूर
सागरांत होईं चूर
अघटित हें । नित्य घडे ।
निर्मळास जवळ न दूर ॥

काळोखी मेघांतून
तेजाची प्रगटे खाण
अघटित हें । नित्य घडे ।
सुख चमके दुःखांतून ॥

* * *

## ३३ भावमाला.

प्राणाधारा प्रणयमधुरा जीवनानंद मूर्त्ति
प्रेमोद्दीप्ता हृदयगगनीं नाचती दिव्य स्फूर्ति
चित्ताच्याही हृदय-मुकुलीं आसनस्था तियेला
अर्पायातें हृदयरसिका गुंफि ही भाव-माला

२७-१२-२३ १

होई चित्तहि शांत ती गडबडी वृत्तीहि तैं मावळे
दृष्टी बाष्पनिरुद्ध होउनि तदा जाणीव सारी गळे
प्रेमें सद्गद कंठ होय हृदयीं स्पष्टत्व ये मूर्तितें
होई काव्यरसा क्षणांत भरती दे कल्पना स्फूर्तितें ॥
नाहीं ओळख कोण काय कुठले कांहींच ठावें नसे
चित्तासी नकळे क्षणांत हृदयीं मूर्ती कशी ती ठसे
होई मीलन जैं क्षणैक नयनीं वाटे जणू ओतिलें
संदेशामृत दिव्य ओळख पटे कैशी परी ना कळे ॥

३

प्रीतीची हृदयास गांठ बसली रूपैकता पावली
होई दृष्टि अधोमुखी पदरजीं गुंफीत मुक्तावली
पुष्पांचा मृदुहार कंपित करें कंठीं तदा घातला
अश्रूंचा सुमहार पादयुगुलीं तो धन्यता पावला ॥

५-३-२४ ४

व्हावें नित्य निराश काय इतुकें भालीं तुवां रेखिलें
व्हावें काय विदीर्ण नित्य हृदयें दुष्कल्पनांच्यामुळें

शांतीचा नच लेश काय नशिबीं या जीवनीं चाखणें
तूं मृत्यो तरि हो सहाय्य मजसी धिक् धिक् असो हें जिणें ॥

१८-६-२४ ५

गेला काल गडे कधीं न दिसणें दृष्टीस कांहीं पुन्हां
गेले मित्र तसेच आप्त सगळे ते पार गेलेच ना ?
झाले लुप्त विचार येत दुसरे गेल्या जुन्या कल्पना
गेलें सर्व परी मन:सुखकरी त्यांची स्मृती जाइना ॥

१९-६-२४ ६

प्रीतीची विजयी ध्वजा फडकतां ये चारुता नूतन
होई शीतल निर्झरासम तदा तें शांतही जीवन
लोपे बालस्वभाव मुग्ध हृदयीं आश्चर्यदृष्टी स्फुरे
कोडीं नित्य नवीं नवीं उकलतां आनंद चित्तीं भरे ॥

७

जाई दृष्टि उदास कोठ न कळे प्रेमार्द्र हो लोचन
चिंतामग्न मुखीं हळूच विलसे माधुर्य हास्यांतुन
प्रीतीची पटतां उदास हृदया ती एकदां माधुरी
होई जीवन गंधयुक्त रुचिरा मंदानिलाच्या परी ॥

२१-६-२४ ८

आतां दूर कशासि राहसि गडे उत्कंठचित्ता असें
व्हावें मीलन तें–क्षणैक जरि कां–हेतू मनीं हा वसे
प्रीतीसंगम–मंजुगान हृदया नादावुनी सोडुं दे
राहूं तन्मय एकचि क्षणतरी आत्मैक्य होवो गडे ॥

९

चित्तांची हृदयासि ओळख पटो मी–तूंपणा लोपतां
स्वातंत्र्याद्यधिकारवाद सरती ये जीवनीं चारुता
कांहीं न्यून नुरे सवेंच उतरे पृथ्वीवरी पूर्णता
राही स्वर्ग कुठें दुरी वद जरी हो चित्त–आत्मैक्यता ॥

२३-६-२४ १०

सारोनी हृदयावरील पटला वाटे असें मन्मना
दावावें निज अंतरंग तरि कां तें मूकता सोडिना...
राही स्तब्धचि ऐकतां प्रियवचां जीं ऐकण्या उत्सुक
देई उत्तरही परी निजमनीं, होईल कां ठाउक ॥

११

भाषा मूक कशी कळेल म्हणुनी बोलावया इच्छितां,
बोलावें तरि पाहतांचि वदना येई वचा मूकता
पाहू रम्य मुखा क्षणैक तरि कां आशा मनीं ही वस
येतांची जवळी परी गडबडी दृष्टी अधो होतसे ॥

२४-६-२४ १२

भाषा मूक जरी नसे परिचिता तैं प्रेमतंतू असे
एकाचें हृदयस्थ गुप्त गुजही अन्यास दावीतसे
राहे गूढ जरी मदीय हृदय तूतें नको कल्पना !
नाहीं बंधन, हाय ! छे ! परि गडे कैसें पटावें मना ॥

२५-६-२४ १३

राहो सर्व अतां उदास रडणें फेंकी निराशा दुरी
दुःखाचा बहु घोर पर्वत पुढें भीतीस दावी जरी
मागें घेउं नको धरीं निजमनीं गंभीरवृत्ती अतां
होणारें न कधीं चुकेल म्हणुनी सोडूं नको शांतता ॥

१४

गेल्या भंगुनि हाय हाय सगळ्या आशा मनींच्या मम
गेलीं पार लपोनि दैवपटलीं ध्येयेंहि सर्वोत्तम
सारे उच्च विचार तेहि जिरले हा दैव निष्ठूरता
वांचोनी मरणें असोनि नसणें धिक् धिक् अशा जीविता ॥

३०-६-२४ १५

होतें चित्त मदीय नित्य आपुलें सत्कल्पना गुंफित
नाहीं ठाऊक त्या कधींच जग हें दुश्चित्त लोकांकित
संपे बालदशा सवें उघडती संसारदारें तदा
होई चित्त भ्रमांध पाहुनि गडे आंतील त्या आपदा ॥

१-७-२४ १६

होतें ठाऊक सत्यमेवजयते विश्वास त्याच्यावरी
टेवीं चित्त जगांत मात्र उलटी रीती दिसे तैं परी
पाही नित्य असत्यवैभव तदा राही मुळीं धीर ना
आश्चर्यें मन थक्क होय हृदयीं निश्चेष्ट हो भावना ॥

२-७-२४ १७

प्रीतीची पहिली नशा उतरली हो चित्त तैं जागृत
नानादोषगुणादि जे न दिसले प्रेमांध नेत्रांप्रत
होती गोचर ये तदा हळुहळु चित्तास उद्विग्नता
लागे सौख्यरवीस त्या ग्रहण तैं जाई मनःशांतता ॥

१८

आशेचा फुलता गुलाब बघुनी आनंद चित्तीं भरे
विश्वाचें क्षणिकत्व तैं विसरुनी कर्तत्ववृत्ती स्फुरे
ध्येयाचेंहि निशाण उंच करुनी विश्वास जिंकावया
जाई तोंच तनूस कंप सुटला मृत्यूस पाहोनियां ॥

१९

विश्वातें बिनवारशी समजुनी जिंकावया चाललें
विश्वाचा परि सूत्रधार बघुनी तेथेंचि कीं राहिलें
गेलें मीपण चित्त शुद्ध अवघें झालें पदाब्जीं नत
विश्वांचा धनी मृत्यु, जीवन नसे हें जाहलें निश्चित ॥

२०

जेव्हां सन्निध चित्त तैं तव कुठें ही कल्पना त्रासवी
होई चित्त उदास काय नकळे अन्यक्षणीं मोहवी
जाई दुःख सवेग एक हृदयीं तो प्रेमभाव स्फुरे
जावें दूर कधीं न हीच हृदया साशंक आशा उरे ॥

२१

विश्वासें धरिला गुलाब स्वकरीं तत्सौरभीं गुंगलें
आश्चर्यें नवलाकृती निरखुनी तल्लीनता पावलें
माझा मीपण हें मदीय हृदया गर्वच दे धन्यता
बोंचे कंटक तों करासि, घडलें तेवींच कीं हें अतां ॥

२२

शोकें चित्त थरारलें तरि न कां विच्छिन्न तें जाहलें
अश्रूंच्या प्रलयीं बुडे फिरुनियां कैसें परी वांचलें
झालें पूर्ण विदीर्ण शाश्वत जरी निःशब्दता पावतें
होतें जीवित पूर्ण—काय न कळे येई परी आड तें ॥

२३

केलें आजवरी जगांत आपुलें कर्तव्य ध्येयापरी
त्याची गोड स्मृती मदीय हृदया राहील जन्मांतरीं
यावच्चंद्रदिवाकरौ तव कृती सूर्यापरी तेज दे
दावाया मम शब्द दीप तिजला लागेल कैसा वदे ॥

२४

गेले दीन किती तया न गणती राही अतां मन्मना
प्रेमाची कलिका फुलोनि गळली साहे न ही कल्पना
स्नेहाचें जल शिंपडोनि जगली झाली परी ही शिळी
भावाचा नुरलाच उत्कटपणा धुंदी न वासा मुळीं ॥

२५

ऐसें होइल हें कधीं न पटलें ना वाटलें मन्मना
कालाचा महिमा अगाध पटलें ना स्वानुभावांविना
गेला काल जरी सुवास नुरला पुष्पास ये म्लानता
त्यांची गोड स्मृती परी उमलवी ताजी कळी कीं अतां ॥

२६

केव्हांची उभि सारखी नजर ही वाटेकडे लावुनी
आशा एकच पाहशील वळुनी प्रेमार्दशा लोचनीं
जाशी दूर पदोपदीं न वळतां होतीं पळांचीं युगें
दृष्टीआड तरी वळून बघसी आशेवरी या जगे ॥

२७

प्रीतीच्या कबरीवरी फुलविती कोणी बगीचा नव
काव्याचीं सुमनें कुणी उधळती अप्राप्त प्रीतीस्तव
कोणी वर्षुनि गोड चुंबनसुमें झोपेंतुनी जागवी
जागा जीव परी तहान आपुली आशेवरी भागवी ॥

२८

प्रीतीची मम गाढ ओळख तुला केव्हांच आली असे
राही सुप्त सदा तरी प्रियसख्या अंतःकपाटीं वसे
गेला काल पुन्हा पुन्हा स्मरुनियां स्वप्नें सदा पाहत
हाकेचा पडसाद मात्र उठतां होईल कीं जागृत

२९

आहे देव जगांत तो चहुंकडे चित्तास ठावें असे
भक्तांचा परि प्रेमभावचि तया मूर्तींत ओतीतसे
आकाराविण विश्वव्यापि विभुही कोंडूनियां देउळीं
प्रीतीचा महिमा अगाध असला गातात श्रीदावली ॥

३०

राही मूक तरी, नको क्षणभरी आणूं मनीं कल्पना
प्रीतीचा भर ओसरेल अथवा हो विस्मृती मन्मना
सौख्याच्या तव चिंतनांत मुरले रेणूहि माझे गडे
शब्दांची नुरली मुळीं गरजही आत्मैक्य जै कां घडे ॥

३१

तेवीं आजहि सौख्यचिंतन तव शब्दांमधें ओतुन
आकाराविण विश्वव्यापि प्रणया पानांमधें कोंडुन
प्रेमें पाठवितें अजी प्रियसख्या स्वीकार त्याचा करी
आतां एकचि याचना तुजकडे दे दर्शना सत्वरीं

* * *

## ३४ तिळगुळ.

तिळगुळ घ्या हे बिनमोल
मधु वचनांचें परि मोल ॥ धृ० ॥

प्रेमलतेचे हे दाणे । फिरती जागीं बापुडवाणे ।
देह–शर्करा त्यांस मिळे । जगताचें मग रूप कळे ।
दुःखाची मिळतां आंच । कांटे अंगावर साच ।
उभारिले जरि ।
भिऊं नका परि ।
मधुरचि अंतरीं ।
तिळगुळ घ्या हे बिनमोल ।
मधुवचनांचें परि मोल ॥

नव्या जुन्यांचें संक्रमण । मत–भेदांचें होय रण ।
चित्तासी फुटती फांटे । विवेकवल्लीचे कांटे ।
रणांगणावरि सुदर्शन । प्रतिशस्त्रहि त्या मधुवचन ।
माधुर्याचे ।
शांतरसाचे ।
वीरत्वाचे ।
तिळगुळ घ्या हे बिनमोल ।
मधुवचनांचें परि मोल ॥

हृदयाचे हे शाहीर । फिरती जरी दारोदार ।
गाणें गाती प्रेमाचें । वीरत्वाच्या जोमाचें ।
परतायातें हे वीर । सांगा कोणातें धीर ।

प्रीति–देवता ।
प्रेषित दूता ।
या बालेचा ।
मुजरा घ्यावा शाहीरा ।
मधुवचनांच्या आहेरा ॥

१९२४

* * *

## ३५ धरणीचें स्वप्न.

कोणाचे हे धूसर गाडे
कुठें चालले कुणीकडे ॥ धृ० ॥
क्षणांत दिसतो रंग रुपेरी
क्षणांत भासे कीं सोनेरी
रंग गुलाबी हंसे त्यावरी
कुठें चालले कणीकडे ॥
नीळपटावर पहा सरकती
सारिपाट कां कुणी खेळती
किंवा भिर भिर वाऱ्यावरती
वसन सुकविती कुणी गडे ॥
मेघांचें कां बाळ सानुलें
हत्तीवरती बसुनी चाले
वाघ सिंह हे कुठें निघाले
सर्कस जाते कणीकडे ॥

गंधर्वांची अद्भुत नगरी
कुणी वसविली असे अंबरी
आज इथें तर उद्यां कुठें तरी
धरणीला कां स्वप्न पडे ॥

वीज चमकली क्षणाभीतरी
रणवाद्याच्या झडल्या फेरी
काळोखाच्या कीं अंधारीं
बाण वर्षती चहूंकडे ॥

हृदयावरती घाव झेलितां
अंकुरली सृष्टीची माता
धरणींतुन हिरवी कोमलता
प्रसन्नता ये चहूंकडे ॥

हंसल्या माळावरच्या वेली
वाऱ्यावरती सुमनें फुलली
आणि फळाया अधिर जाहली
जीवनसृष्टी चहूंकडे ॥

धरणीवरती जीवन धांवे
सागरांत मग मीलन व्हावे
नील नभावर पुन्हां चढावें
तरंगत जाई चहूंकडे ॥

* * *

## ३६ लालीचें प्रश्नचिन्ह.

(आंबाघाटांतून कोल्हापुरास जातानां.)

ही नागमोड मग जातां वळणांतून
गोवत्सें पुसती जणूं तिला अडवून
तूं कुठें चाललिस माग कुणाचा घेसी
कां लपून झाडाखालीं वळुनी जाशी ?
मोत्यांची सृष्टी राहि सागरा–आंत
मोत्यांचे सर मग ओघळती शद्वांत
ही नवीं क्षितीजें नव्या मनाची ईर्षा
कीं उतूं चालली रसिकाचीच विमर्शा
झाडांची हिरवी शोभा ही भंवताली
ही वाट चालली मोड घेउनी खालीं
अरुणाची लाली कुठें हांसवी फूल
तर कुठें झुले पर्णांची हिरवी झूल
चहुंकडे पसरले डोंगरमाथे उंच
चौकोनी डुलतें मधेंच हिरवें शेत
हें कुणी घातलें वर्गमूळ कलहाचें
कीं कुणी आंखिलें गणीत हें भूमितिचें
मग मधेंच दिसती गवताच्या त्या गंजी
पांढुरक्या छाया हिरव्या लाली माजी
जरि उंच उंच ना झाडाचें या अंग
छायांची रुंदी वारि दुपारीं आग
हा पाट शिलांना पोटाशीं घेऊन
चालला न्हावया महासागरीं लीन
जातांना करतों सुपीक दोन्ही तीर
ही सप्तपदांची संगत देई धीर

धरणाचे बंधन कुणी घालतां यास
सामर्थ्य विजेचें जीवन दे धरणीस
शक्तीची आणि त्यागाची ही मूर्ति
ही महाराष्ट्र जनतेची जीवन स्फूर्ती
मग वैचित्र्याच्या रंगे रंगुनि गाई
ओसाड माळरानावरती अंगाई
ते काळे कातळ कुठें लाल मातीचे
अन् हिरवें वैभव नाचणिच्या शेतीचे
आकाश निळें अन् तीरावरचें रान
या नील दर्पणीं पाही डोकावून
वाहतें नीर तें, सदाच पुढती जाई
परि तीरावरची सृष्टी विंबुनि राही
ही निळी वाट पाण्याची जाई खालीं
शेजारुन वळणें घेउनि वरती लाली
होईल नीलिमा लीन सागरा–आंत
लालीस कुठें होईल कळेना अंत
कधिं हिरवी साडी नेसुनि घेई लाली
तर कधीं आडवी सरिता पदराखालीं
तर कधीं पांघरून वीत नभाचें नील
परि विशाल क्षितिजें होती अधिक विशाल
ही नव्या जगाच्या ज्ञानाची जणुं भूक
कीं मूक जगाची अज्ञाताला हांक
कीं मागुनि घ्याया सत्यवान सावित्री
चालली निग्रहें महाराष्ट्राची पुत्री
होईल मनीषा पूर्ण ठाम विश्वास
परि कधी ? जाचतें प्रश्नचिन्ह हृदयास

* * *

## ३७ तूं आंत आणि बाहेर.

तूं आंत आणि बाहेर
तूं जवळ असुनिया दूर ॥ ध्रु ॥
तिळगुळ घे म्हणतां लपशि अंतरा—आंत
परि उगें राहतां पुढें पसरिशी हात
मम व्याकुळ गीतें सदा करिशी बेसूर
तूं जवळ असुनिया दूर ॥
सोडतां नाद मग सदाच तूं हृदयांत
राहसी उभा अन् करिशि मनास अशांत
नयनांतुन वाहे निष्फळतेचें नीर
तूं जवळ असुनियां दूर ॥
ढाळिला किती मी प्रीतीचा मोहोर
अन् कृतिपुष्पांनी सदा पूजिली गौर
स्मृतिकांट्याची बोंचणी वाहतो ऊर
तूं जवळ असुनियां दूर ॥
येईल परी दिन भाग्याचा ही आस
तेवीत ठेविते मम जीवनज्योतीस
उजळतें तुझें घर समाधान भरपूर
तूं जवळ असो वा दूर ॥

१९५२

* * *

## ३८ तीरावर नांगरलेल्या पडावास.

तूं होता डोलत हिरव्या लाटांवरती
वाऱ्याच्या झुळुका झोके तुजला देती
ये एकाएकी नृत्याची तुज स्फूर्ती
मोत्याचे घुंगुर वाजति लाटावरती
तूं दोन पाउलें मारलींस हौसेने
खुळखुळले घुंगुर लाटांवर मौजेने
आवाज तयांचा घुमतां तव कानांत
मग नशा संचरे नृत्याची तुज आंत
घेतलीस गिरकी होउनियां बेहोष
फिरतांच जाणवे तीराचा तुज पाश
आकाशीं होत्या तारा तारानाथ
रंगणीं नांचतां तुजला बोलावीत
धरु नको हांव परि उडण्याची आभाळीं
तो दुजा पाश तुज ओढिल मागे खालीं
तूं नाच हवा तर हळूच वरती खालीं
बेहोषी नाहीं तुझ्या नशीबीं लिहिली.

* * *

## ३९ याचना.

तिळगुळ वदति मला
भिक्षा मधुवचनें घाला ॥ धृ० ॥

होतों हृदयाचा मी वीर
प्रेमी चित्तांते दे धीर
परि आतां वेडा पीर
घेई करिं चौपदरीला ॥

ज्या हृदयाचे संदेश
न्याया शाहीराचा वेष
घेउनि हिंडे देशोदेश
त्यावरि दैवकोप झाला ॥

होतों प्रेमाचा शाहीर
वंदिति मातें सकलहि वीर
मुजरा करी मनहि खंबीर
आतां उलट काळ आला ॥

अवघ्या एका निमिषांत
होई साम्राज्या अंत
हातीं चौपदरी येत
येई अवचित हा घाला ॥

जातां हृदयाच्या दारीं
मधुवच सुस्वागतकारी
येई मजला सामोरी
वैभवकाळ परी गेला ॥

गेलें सर्वस्वाचें गान
उरली प्रेमाचीही तान
गिळुनी साराही अपमान
म्हणणें आलें नशिबाला ॥

उच्चासनिं मज बसवीती
कुशलहि बहुत विचारीती
प्रेमें हृदयासी धरिती
आतां कुणि न पुसे मजला ॥

जेथें उच्चासनिं बसलों
तेथें भिक्षेस्तव आलों
प्रेम निर्लज्जचि ठरलों
उरली विनती पदकमला ॥
भिक्षा मधुवचनें घाला ॥

* * *

## ४० हृदयिंची आशा.

ही एक हृदयिंची आशा कधिं होइन पूर्ण विरागी ॥ध्रु०॥
वीतराग परिही रागी निःसंग तरीही भोगी
ही स्थिती स्थितप्रज्ञाची होइल कां हृदयीं जागी
ऐशाहि महद्भाग्यातें भोगिल कां जीव अभागी
हें कर्तत्त्वाचें लेणें
दैन्यानें कैसें घेणें
परि आशेने या जगणें
कधिं होइन पूर्ण विरागी ॥
जन्मोजन्मीच्या गांठी कर्माच्या कैशा तुटती
आसक्ती विषयांवरची होइल कां पूर्ण विरक्ती
प्रीतीच्या ओघामध्यें विश्वें कधिं वाहुन जाती
व्यक्तित्व कधीं जाईल
अव्यक्त व्यक्त होईल
स्वांतरीं मजसि मिळवील
तैं होइन पूर्ण विरागी ॥
मम वैराग्याची खूण राहिल मम हृदयावरती
स्वार्थाचे तोडुनि बंध मारील भरारी प्रीती
तीवरी बैसुनी मोद पाहिन मी सारी जगती
ईशाची लीला बघुनी
सुखदुःखें एकचि मानी
विश्वाचीं रुपें दोन्हीं
तैं होइन पूर्ण विरागी ॥

* * *

## ४१ नलिनी.

रक्तरंग हा खुले चहुंकडे क्रोधाचा कीं प्रेमाचा।
पश्चिम भागीं उभा सूर्य हा खिन्नचि कां दिसतो साचा॥
कीं प्रेमाच्या विशुद्ध लहरी मूक करिति तद्हृदयातें।
गाती पक्षी आनंदाने प्रेमाचीं मंजुळ गीतें॥
कलिका विकसति वेलींवरती सुवास पसरे आकाशीं।
मंदमंद हा वायू वाहे झुलवित झुलवित ने त्यासी॥
सुवास पसरे रानोरानी गिरीगव्हरा भेटोनी।
सरित्प्रवाहासवें चालला गुंग होउनी तद्गानीं॥
दृष्टी खेळे चहूंकडे तो शोधितसे तरि कोणाला।
सवें धांवला पाहुनि एका स्तब्ध मुक्या मुखकमलाला।
उभी ठाकली विमला बाला नदीतटाकीं एकाकी।
कोण कुणाची कोणा ठावें केशपाश वक्षा झांकी॥
पवनासंगें केश खेळती लपविति कांहीं गालांसी।
संध्यारंगीं स्नान करोनी तांडव करिती आकाशीं।
उंच खडक त्यावरी टेकिला वामहस्त झेली वदना।
दुज्या हस्तिचीं सुममाला बहु सुगंध फेंकी बकुळांचा

× × × ×

पुसे तियेतें सुगंध प्रेमें ‘ कोण असे तव मैत्रिण ही।
खिन्न दिसे कां? कोमल वय हें हास्य परी नयनीं नाहीं ’॥
‘ काय सांगु मी गड्या तुला बघ एकुलती कन्या जाण।
बहू लाडकी पितरांची परि सत्वगुणाढ्या तव आण॥

किशोर वय परि गोष्टी बोले भल्याभल्याही लोकांच्या ।
अद्‌भुत बुद्धि कौतुक उपजवि प्रेमाकुल मनिं पितरांच्या ॥

बोल मधुरतर, मुख रम्य अती हृदयीं प्रेमाचा पूर ।
दुःख पाहुनी इतरांचें बघ नयनांतुनि वाहे नीर ।

कोमल हृदयी कोमल शरिरी कोमलता कीं मूर्तिमतीं ।
पाहुनि वदना ऐकुन वाणी गुंग होतसे चित्त अती ॥

हास्य विराजे सदा मुखावरी ध्वजा जणूं आनंदाची ।
फडके, संदेशवि जगतातें अनिंद्यता तत्हृदयाची ॥

प्रेमळ भावें सदा सौख्य दे सौंदर्येंही पितरांसी ।
कोण जन्मिचें पुण्यचि फळलें ऐशी कन्या येई कुशीं ॥

सोळा वर्षें पूर्ण जाहलीं कीर्ती पसरे चहूंकडे ।
कितिक तरुण तत्पाणिग्रहणासाठीं होती ते वेडे ॥

नलिनी-शशधर संगम आला विवाहसूत्रें ती बाला ।
निगडित झाली, आर्य कन्यका शोभवि गृहिणी पदवीला ॥

प्रेमसिंचनें लता वाढली प्रेममयचि हो संसार ।
प्रेमाविण हें जगतहि होई प्रेमळ हृदया निःसार ॥

प्रेम तारिता प्रेम मारिता प्रेम वाढवी संसार ।
प्रेमचि माया प्रेम असें हें सकलहि वेदांचें सार ॥

प्रेमासाठीं पक्षी गाती सृष्टीही प्रेमासाठीं
फुलवि पसारा ऋतूऋतूंचा प्रेम असे सर्वांपाठीं ॥

मरणोन्मुखही प्रेम जीववी जागवि निद्रोन्मुख प्रेम ।
प्रेमासाठीं दुनिया चाले साधक साधनही प्रेम ॥

असो यापरी डुंबत होतीं प्रेमसागरीं तीं दोघें ।
अवचित दैवचि प्रसन्न होई प्रेमपरीक्षेतें मागे ॥

मित्र हृदयिंचा भेटी आला जीवनदाता पूर्वींचा ।
पाहुनि त्यातें हृदय दाटलें प्रेमें मूकहि हो वाचा ॥

'बहुत दिसांनी दर्शन दिधलें होती कोठें तव स्वारी ?'
ओसरतां भर आनंदाचा वदला शशधर कसा तरी ॥

मित्र वदे मग उदासवाणी ' मित्र असे तूं जीवाचा ।
सत्यवचन तुज म्हणती सारे मिथ्या करिं नच तव वाचा ॥

आठवतो तुज दिन कां आतां वसंत ये जैं मौजेंत ।
पोहायातें गेलों होतों तदा आम्हीं त्या सरितेंत ॥

बुडतां बुडतां हात देउनी काढियलें तुज बाहेर ।
म्हणुनी मजसी मित्र मानुनी प्रेमहि दावियलें फार ॥

फेडायातें उपकार तदा होशी तूं शीघ्रचि सिद्ध ।
तदा वारुनी ठेवियलें मी करुनी तुज वाचाबद्ध ॥

त्या वचनातें सत्य करोनी सुखवी तव ह्या मित्रास ।
भगिनी स्वीकारुनियां माझी तोडी हा मायापाश ॥

तव करिं अर्पुनि तिजशीं जातों घ्याया संन्यासीदीक्षा ।
घाली मित्रा घालिं तुझ्या या मित्रातें इतुकी भिक्षा ॥

पूर्वप्रेमाच्या साक्षीनें याचितसे तुजसी आज ।
सत्यप्रीति बघुनी तव ही वाटो सत्यातें लाज ॥

असे ठाउकी तव हृदयाची आवड मोठी काव्याची ।
काव्यमय नसे माझी भगिनी म्हणुनी तर भिक्षा याची ।

संसाराचा रस्ता सुखकर शिकवुनि कर तुजयोग्य तिज ।
कठिण नसे हें तुजसम पुरुषा होइं सहायक परि तूं मज ॥

संन्यासाचा मार्ग दुर्ग हा आधिंच आक्रमिण्या पाही ।
तरी मग कशी मायाबेडी ठेवूं मित्रा मम पायीं ।

आत्मोन्नतिच्या मार्गा लावुनि मिळवी पुण्याची जोड ।
मित्र–प्रेमा रंग उच्चतर चढवी, पुरवी मम कोड ' ॥

ऐसें बोलुनि मित्र परतला स्वस्थाना भगिनीपाशीं ।
सांगे तिजला वर्तमान हें ' बद्ध करीं तुज नवपाशीं ॥

विश्वासाचें तव प्रेमाचें सर्वस्वाचेंही स्थान ।
आजपासुनी पती, बंधु नच, आर्यकन्यके तूं मान ' ॥

मित्र परतला मित्रवचन परि खोल जाईं तद्हृदयांत ।
प्रेमनिष्ठही सत्यनिष्ठ मन तदा भ्रमत आंदोलांत ॥

' हाय हाय हें काय जाहलें द्विधा होतसे मम हृदय ।
जीवनाश तरि कां नच करिशी विधि होई तूं तरि सदय ॥

कैसे दावूं नलिनी, वदन तुज, घालूं तरि कैसा घाव ।
कोमल हृदयावरिं तव आतां धरिणी दे मजसी ठाव ' ॥

पती वचन ऐकुनी बालिका स्वब्धचि होई क्षणएक ।
आश्वासुनियां तया बोलली ' मी अर्धांगी तव देख ॥

सत्यपालनीं सहाय व्हावें हेंचि गडे कर्तव्य असे ।
शीलासाठीं शद्ध राखुनी सुखी करावें मजसि कसें ॥

तव हृदयांच्या वीर्यलहरि या शांतवितिल मम हृदयाग्न ।
प्रेमपाश दृढ करितिल हृदया निराशवातें जरि भग्न ' ॥

बोल मधुरतर ऐकुनि सखिचे दुःख दुणावे तच्चित्तीं ।
दुःख हृदयिंचें परि बोलाया नाहीं वाचेतें शक्ती ॥

सदा झुरे तो रात्रंदिन मनिं विचार भेदी तद्हृदया ।
पाहुनि त्यातें दगडहि कढती कशि न येत परि विधिस दया ॥

तदा बालिका मनीं विचारी मीच दुःखजननी होय ।
जरि मृत होतें तरि हृदयातें मित्रभगिनी होईं प्रीय ॥

मम विरहाग्नी जाळिल हृदया तरि तें जाइल तिजपाशीं ।
सूर्य–तप्त नर छायेसाठीं जवळि करित तरुमूलाशी ॥

विचार करुनी यापरि चित्तीं दृढतर ती धरुनी भाव ।
हांसे बोले दिवस चालला लागूं नच दे परि ठाव ॥

पतिनिष्ठा अन् मनःशान्तिही समाधान देई त्यास ।
शांत कराया निज चित्तातें जाई तो मग फिरण्यास ॥

निरोप घेउनि प्रतिकृतीचा पतिच्या प्रेमे वंदून ।
चरण तयाचे, झणीं घेत मग तन्मालेतें काढून ॥

ती मी माला बकुलफुलांची धरुनी मजला हृदयासीं ।
झणीं येत मग नदी–तिरीं या ' शब्द जिरति कंठापाशीं ॥

करुणगान मग कानीं आलें हृदयचि जणुं मग पाझरलें ।
दुःखभरानें, शोकभरानें प्रेमभरें कढुनी गेलें ॥

अस्फुट शब्दें बोले बाला ' निष्ठुर दैवा काय असा ।
केला मी अपराध तुझा रे दावा धरिला खास कसा ॥

नव्हे नव्हे मी चुकलें नाथा क्षमा करा मज क्षमा करा ।
वचनपालनी सहाय्य होउनि धन्य होइं मम जन्म खरा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. ८०५८

भाग्य खरें मम तव प्रेमाचें अमृत प्यालें रात्रदिन ।
आज उगवला दिवस खरा ह्या अमरत्वीं व्हाया लीन ॥

जय जय माते सरिते घेईं पदरीं ही तव अज्ञानी ।
सौख्यचि वितरो पतिसंसारीं मागतसे हेंची जननी ॥

आई आलें भेटाया तुज स्वर्गींची देवी तूंच ।
तव पदधूळी पुनित करितसे स्वर्गाही ही आलेंच ॥

येतें नाथा प्रणाम घ्यावा ये माले हो मम कंठीं ।
विराजित आतां आमुच्या त्यांच्या स्वर्भूमीमध्यें भेटी ॥

ऐसें बोलुनी चुंबुनि माला घालीं कंठीं मग तीही ।
उदक उसळलें दुभंग झालें हृदयीं तिज आश्रय देईं ॥

* * *

## ४२ स्वागत गीत.

हृदयांतले । मधुभाव हे ।
उधळोनियां । करुं स्वागता । अजि आगता ॥

भ्रमराविणें । फुलणें फुका ।
झुरणें वृथा । प्रणयाविना । हृदयासि ना ॥

रसिकांवली । अजि पातली ।
मधुगायनें । रमवू मना । हरवूं शिणा ॥

पडतां उणें । करणें क्षमा ।
समजूनिया । शुचिभावना । विनती तुम्हां ॥

* * *

## शीण.

शिणला जीव, शिणली हांव शिणला अवघा पसारा ॥ सारा ॥

आनंदाचें गोड विलोभन
मधु आशांचे अधिरहि नर्तन
नुरलें वा मनिं यश–आकर्षण
उरे अढळ कर्तव्याचा ध्रुवतारा ॥ १ ॥

तारुण्याचें क्षणभर वैभव
जीवन जमवी अनंत अनुभव
गांठोडें जड वाहूं कुठवर
आस एक मनिं हलकें करुं भारा ॥ २ ॥

सुखदुःखांचें देणें घेणें
स्नेहाचें रुसव्याचें लेणें
जगतांचें हें रीण चुकविणें
होइल कां मज शक्य असारा ॥ ३ ॥

* * *

## ४४ जा खुशाल दगड बनून ( नवकवींची क्षमा मागून )

विसरुनियां निजचैतन्य
जा खुशाल दगड बनून ॥धृ०॥

नाहींच मुळीं मज खंत
नाहींच मुळीं मज भ्रांत
तुजविणें कुठें ना अडत
जा खुशाल दगड बनून ॥

मनगटांत अमुच्या जोर
माघार मुळि न घेणार
मूल्येंही बदलूं पार
कोमलता निज विसरून ॥

दावितां कुणाला भीती
परक्यांची दावुनि प्रीती
दुर्बलता झांकाया ती
शस्त्रास धार देऊन ॥

मातेवर घालुन घाव
मिळविलें तुम्हीं जगिं नांव
पत्नीचा होत लिलांव
पाहतां नयन झांकून ॥

शिणलीच सतत जी कूस
रुधिराचा देतां घांस
अन् वाहुनियां नउ मास
वासनेंत हो बलिदान ॥

देहाचें देई वसन
तो विणकर मायेवीण
उघडाच श्रमत, विसरुन
तव नजर धुराड्यांतून ॥
श्रमिकांस बघत शोधून ॥

संसारताप जी साही
साउली परी तुज देई
जवळीच तुझी ती आई
तव चित्त फिरत रस्त्यांत ।
पथिकांची कींव करीत ॥

अंगणांत हंसरे फूल
कुतुकाविण होत मलूल
तूं निष्क्रियतेची झूल
पांघरून नंदीबैल ।
बसलास डोलवित मान ॥

क्रान्तीचा करिशी घोष
कां उगाच कंठा शोष
रक्तांत स्नान करण्यास
अबलांस देसि सोडून ।
दगडही श्रेष्ठ तुजहून ॥

लेखनांत जीवन जगसी
जीवनीं उतरण्या भीशी
दुर्बलता तुजला ग्रासी
कां लपशी दगडांतून ।
जा खुशाल दगड बनून ॥

परक्याचें घेउन रीण
परदास्यीं जाशि बुडून
परक्यांस हांक देऊन
कां करिशी अवमूलन ।
जा जा तूं दगड बनून ॥

कुणि रामा धीरोदात्त
प्रीतीचें अस्त्र उरांत
त्यागासी धरुनी करांत
पुसटत्या पदरस्पर्शेही ।
उठवील तुझ्यांतिल मानव ॥

* * *

## ४५ वरदान.

शारदे करावी सेवा तव ही आस ।
रखरखित जीवनीं फुलवी हिरवळ खास ॥ दे.

देहास जखडिती परिस्थितीचे पाश ।
विहरते परी मन होईनाच निराश ।
जगताची धात्री साधिसि बुद्धिविकास ।
या नवरात्राचें अधिष्ठान तूं खास ।

भाग्याचा उगवे वाढदिवस तव थोर ।
वरदान देई मज उगवो वारंवार ॥

* *

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
दि.
शाखा

## ४६ देवाच्या राऊळांत.

देवाच्या राऊळांत। पाण्याचा अभीषेक
गांजिते तानभूक। आंगणांत
देवाच्या राऊळांत। दीपांची लागे माळ
चाले सावल्यांचा खेळ। आंगणांत
देवाच्या राऊळांत। सुमनांची होय रास
कांटे बोंचती पायांस। आंगणांत
देवाच्या राऊळांत। शालु शेले भरजरी
उघडे जीव दारीं। कांकडती
देवाच्या राऊळांत। पंच पक्वान्नाचीं ताटें
तिष्ठती दारी पोटें। उपवासी
देवाच्या राऊळांत। घंटेचा घणघणाट
दलितांचा तळतळाट। ऐकेचना
देवाच्या राऊळांत। वैभवास सीमा झाली
परि दारिद्र्यें गांजली। जीवसृष्टी
गरज नाहीं जया। त्यास नको तेंच देणें
काय भक्तीचें हें लेणें। देवराया
काय सत्याची ही कांस। काय न्यायाचा विकास
दुःखानें गांजल्यास। दुःख देणें

* * *

## ४७ समांतर जीवन.

चालतें सारखी तिळगुळ घेउनि वाट
कधिं पडेल माझी तुझ्यासवें रे गांठ
सारखा वाहतों दोघें एकच भार
सारखेपणाला एवढाच आधार
लागली नजर मम असे सारखी पुढती
दिसतें नयनांना मीलन क्षितिजावरती
हृदयांत नाचती अनंत अनुभव तीळ
फुलण्यास अधिर जणु कळ्या, सुकुन जातील
आशेंत चालतें, संपेना परि वाट
सरकतें क्षितिजही पुढती पाठोपाठ
देउनियां तिळगुळ तुजला मम स्नेहाचे
फुलवीन कधीं रे कांटे मधुबोलाचे
हें नको कंठणें समांतराचें जगणें
व्यक्तित्वासाठीं अव्यक्तचि कां मरणें !

* * *

## ४८ प्रतीक्षा.

येशि कधीं तूं येशिल सखया
पाहुं किती रे वाट
उंबरठ्यावरि ही मिणमिणती
तेवत जीवनवात ॥ धृ० ॥

तृणांतृणांतुन कणाकणांतुन
दुःखाच्या धूसर छायेंतुन
शोधितसे ना तुज रात्रंदिन
उजळुनि पाउल वाट ॥

येशिल टाकित हळुहळु पाउल
खचितचि मजला लागे चाहुल
आतुरतेनें होइन विव्हल
येतां तूं दारांत ॥

किंवा येशिल बसुन रथावर
मंजुळ किणकिण श्रवणपथावर
पुलकित जीवन कांपे थरथर
सांवरि देउनि हात ॥

येइं परी तूं उडतचि राया
भीतीने थरकांपो काया
करपाशीं तव मिटतां दुनिया
विझुं दे जीवनवात ॥

* * *

## ४९ उत्तर. (श्री. ना. के. बेहरे यांस)

मुक्काम नगरी मुंबापुरी।
सोळा तारीख सोमवारीं।
मार्च महिना ख्रिस्ताब्दामाझारी।
एकोणीसशें पंच्विसाव्या ॥

तीर्थस्वरूप भावोजीना,।
करोनियां साष्टांग नमना।
पुढती विनती विज्ञापना।
करी लतिका स्नेहादरें ॥

इकडे कुशलत्वें वर्ततां।
त्वत्कुशलाची वाहवी चिंता
उत्तरार्थीं त्वरा करितां।
माझीच मी लाजतें ॥

पत्रोत्तरा होय विलंब मातें।
क्षमा असावी विनती तुम्हांतें।
वाटे जरी पुष्कळसें ल्याहावें।
कैसें परी काव्यरसीं जुळावें ॥

आधींच मी मंदमती अजाण
त्वत्कौतुकें लज्जित त्यांत जाण
जैं बोबडे बोलत बाल बोल
प्रेमें परी वाटती रत्नमोल ॥

गाई जरी कोकिळ पंचमांत
गुंजारवीं गुंगत भृंगनाथ
विश्वांतरा तेजवि चंद्रकान्ती
तैं काजवा काय लपे वनान्ती ॥

असें मातें सांगे हृदय हळु, तें आणुनि मनीं।
ल्याहायातें बैसे वचनतनुतेतें न गणुनी
परी ओठांमागें वच हृदयिचें मूक उरलें
तदा मच्चित्ताचें सकळ उसनें धैय सरलें

झालें जरी या परि मूक पत्र
आणोनियां मानसिं प्रेमसूत्र
लतासखी भाव कळो तुम्हांला
स्नेहादरें फारहि पाठवीला ॥

असो अतां काय पुढें ल्याहावें
सारेंच तें जाणुनियांच घ्यावें
ऐशापरी नम्रपणें तुम्हांतें
लिहोनियां पत्रहि थांबवीतें ॥

बहुत शिणलां मत्संवादें क्षमा मजला करा
सुहृद–सखिच्या अधिकाराचा विचार मनीं धरा
फिरुनि नमितें ठेवा लोभा क्षमाहि पुन्हा करा
विनवि चरणा इतुकी जाणा लतासखि,

इंदिरा ॥

* * *

## ५० दिवाळी दिवाळी आ ऽ ली ऽ.

दीप चिमकुले घरोघरींच
दारोदारीं खेळत होते
गीत कुठुनसें तरंगत येई
दिवाळी, दिवाळी, आ ऽ ली ऽ

दुडुदुडु धांवत दारोदारीं
दीप लटकले ओचेपदरीं
गीत उमटलें दिवे कुठें ग ?
दिवाळी दिवाळी आ ऽ ली ऽ

ठसे उमटले गालांवरती
नयनांतुन पाजळल्या ज्योती
ओंठामागुन दिवे हांसती
दिवाळी दिवाळी आ ऽ ली ऽ ॥

* * *

## ५१ फोल संसार !

लंबगोल आरशांत
उभी केंस उगवीत
नजरेंत शय्या येत
पहाटेची वेळ ग ।
कंगव्याशीं खेळ ॥

निळ्या निळ्या नभावर
चवतीची चंद्रकोर
तसा निळ्या चादरीवर
चमेलिचा सर । ग ।
पडे उशीवर ॥

आठवुनि गोड वास
हातांतून सुटती केंस
परी जवळ जातां त्यास
नुरे मुळिं सुवास । ग ।
होय भ्रमनिरास ॥

काल वास घरभर
आज कोंपऱ्याचा केर
शिळ्या फुलांचा संसार
असा कसा फोल । ग ।
कुणा असे मोल ॥

* * *

## ५२ तिची आकांक्षा.

भुरभुर उडती कस मुखावरि डोळेही हंसती।
ढगाआडुनी तेज फांकती तारांच्या पंक्ती।
फूलपांखरूं भिरभिर फिरतें जेवीं स्वच्छंदे।
बालाही तेंवीच विहरते जगांत आनंदें।
पुसे एकदां ताई तिजला हांसत प्रेमभरें।
मास्तरीण वा डाक्टरीण तूं होशिल सांग बरें।
बालमनाच्या आकांक्षांची उडी कुठें जाई।
पहावयातें अधीर होई पुसे पुन्हा ताई।
क्षणैक बाला उगाच राही सांगू का ताई।
नको मास्तरी नको डॉक्टरी होइन मी आई।
होतां मांतां जरि कां बाळें होतिल तीं हट्टीं।
देइन त्यांना ठोक चांगला घेउनियां पट्टी।

* * *

## ५३ सखीस.

कुणाला प्रेम कलहाचें
अबोला आवडे कोणा ॥

कुणाचें प्रेम वरवरचें
कुणाचें अंतरीं नाचे ॥

हंसावें हास्य पाहोनी
रडावे दुःख देखोनी ॥

असें हें प्रेम कोणाचें
मनाचें ऐक्य बाणोनी ॥

कुणाला गोडही बोल
कुणाचें मौन बिनमोल ॥

कुणाला आवडे सौख्य
कुणाला मोहवी दुःख ॥

कुणाला प्रेम त्यागाचें
कुणाला सौख्य भोगाचें ॥

विरोधी भाव हृदयांत
जागवी प्रेम ज्योतीला ॥

नववर्ष सौख्या दायी ।
होवो सखे तुलाही ॥
विनवी सदा विभूला ।
लतिका तुझीच लीला ॥

* * *

## ५४ वंदन.

वंदन करुं अजि तुज भावें ।
शारदे वरदा भव विनवी जन पावें । तुज भावें ।
रम्य मयुर तव आसन
पावनता धवल वसन
करुणामृत नयनांतुन
रसिकांसी लोभावे ॥ तुज भावें ॥
ज्ञान किरण वीणेंतुन
वर्षुनियां वरदवचन
नुपुरांतिल मधुगुंजन
हृत्कमला विकसावे ॥ तुज भावें ॥

* * *

## ५५ प्रीतीचा ‘ क्ष ’

चल देवूं, चल घेवूं, दसऱ्याचें सोनें ।
हीं आपट्याचीं पानें ॥ धृ० ॥

भेटे काळ्या मेघास
सोनेरी करपाश
फुलतो नाग गुलबास
प्रीतीचा खास ॥

नयनांचें मीलन
दोनांत कीं दोन
मिळतां होतीं एकूण
एकची जाण ॥

विश्वाच्या नियमांस
प्रीतीचा क्ष खास
हरघडिला ग बदलीतो
जीवनमूल्य ॥

* * *

## ५६ प्रेमाचे रीण.

जन्मदिनाची स्मृती विसरणें शक्य असे कां मला ।
वाटलें केविं गडे हें तुला ॥
रचिल्या ओळी मनांतील त्या मनांत कीं राहिल्या
पत्रावरि न परी उतरल्या ॥
हृदयाचे कीं भाव कळावे मूक परी राहिले
हृदया हृदयानें पाहिलें ॥
ओळख त्याची कधीं विसरणे शक्य न तुज वा मला।
शंका कोठुनि मग पातल्या ॥
ही स्मृती नसे मम मनास संवेदना
जीवास जन्मतां जेविं असे चेतना
कीं प्रकाश देणें दीपाच्या जीवना
सहजचि तेवीं स्मृती असे तव निगडित हृदयांतरी ।
स्मृती ही प्रीतीतें सांवरी ॥
प्रेमाचें हें रीण सदाचें फिटणें शक्य न मला ।
ऋणाइत जीव सदा राहिला ॥

* * *

## ५७ मधु आशांसह.

येशील जैं परतून तारखे ।
    मधु--आशांसह मधु--आशांसह ॥

द्वेषाचें रणकुंड पेटलें
अणूअणूंतुन ज्वाला खेळे
अंकुरण्या आधींच जळाले
    आशांकित उर स्नेहांकित कर ॥

क्रान्तीचा अजि सुदिन येतसे
क्षणांक्षणांतुन सृष्टी हांसे
हृदयांतुन शद्बांत विकासे
    शुभ आशांसह शुभ आशांसह ॥

नभीं पातला उत्साहाचा
रंग गुलाबी रम्य उषेचा
अधिर हृदय मम घ्याया तिळगुळ
    मधु--आशांसह मधु--आशांसह ॥

* * *

चला जाऊं। चला पाहूं। मंदिरीं या चला जाऊं ॥

मंदिराची मोहिनी
रम्यता वेधी मना
या कलेच्या पूजना
चला जाऊं ॥

बैसुनी मयुरावरी
हांसरी ही देवता
वर्षिते रमणीयता
चला पाहूं ॥

धांवत्या रंगांतुनी
साधुनीयां संगती
देवतेला नटविती
चला पाहूं ॥

पांखरें उडती नभीं
नाचती वाऱ्यावर
फूल अन् वननिर्झर
पदीं वाहूं ॥

वाघ आणी श्वापद
पाहतां भय वाटणें
परि कलेचें खेळणें
चला पाहूं ॥

ओंवुनीयां भावना
रेशमाच्या बंधनीं
अर्पिती माला कुणी
चला पाहूं ॥

चारुता एकाग्रता
जीवनी स्वारस्यता
ये कलेतें अर्चितां
चला जाऊं ॥

* * *

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८०६८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

विमेदारांसाठीं

# जाहीर करण्यांत आलेले बोनस

## मू ल्य मा प ना चे नि का ल

आमच्या विमेदारांसाठीं पुढीलप्रमाणें रिव्हर्शनरी बोनस जाहीर करण्यास आम्हास आनंद होत आहे.

रु. ७ दरवर्षी दर हजारी तहहयात विमा पॉलिसीवर

रु. ५ दरवर्षी दर हजारी मुदतीच्या व इतर विमा पॉलिसीवर

दि

# इंडियन ग्लोब

## इन्शुरन्स कंपनी लिमिटेड

मुख्य कचेरी :

३१५/३२१, दादाभाई नवरोजी रोड, (हॉर्नबी रोड) फोर्ट, मुंबई

## आयुर्विमा, आग, मोटार, मरीन, अपघात

वगैरेचें कामकाज केलें जातें.

ब्रँच ऑफिस : न्यू किताब बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे.

सब ब्रँच ऑफिस : काशिनाथ निवास, नवीपेठ, जळगांव (पू. खा.)

इन्स्पेक्टरचे ऑफिस : मंगळवार पेठ, सोलापूर.

# हेअरझोन

हें तेल ब्राह्मीच्या बिया, काळा भंगरा, ताजे आवळे, कच्चे अक्रोड आणि हिमालयावरील ताज्या फुलांचें अत्तर यांपासून केलें आहे.

या तेलानें पांढरे केंस काळे होतात, लांब वाढतात आणि नरम राहातात. मेंदूचें दौर्बल्य नाहींसें होतें.

**पॅकिंग ४ औंस बाटली**
**१ पौंड ,,**

**सर्व केमिस्टांकडे मिळेल.**

# पायोरिना (दंतमंजन)

वज्रदंती, तेजवती, नीम व बाभळीचा रस, मौलश्री आणि इतर हिमालयांतील वनस्पतींपासून तयार केलेलें हें दंतमंजन सर्व दंतरोगांवरील अप्रतिम उपाय आहे.

पायोरिनानें, दांताची दुखी, हिरड्याची सूज, पायोरिआ, मुखाची दुर्गंधी, इत्यादि सर्व रोग बरे होतात. आणि हें मंजन वापरल्यानें दांत मोत्यांप्रमाणें साफ, सुंदर व तेजस्वी होतात.

पायोरिनांत चरबी किंवा कोळसा मुळींच नसून हें शुद्ध वनस्पतीपासून तयार केलें आहे.

**पॅकिंग १ औंस ½ पौंड १ पौंड सर्व केमिस्टकडे मिळेल**

**बनविणार :**

## दि हिमालया ड्रग कंपनी

**२५१ हॉर्नबी रोड, मुंबई, १.**

**फोन नं. २६७२७, ३०२००. टेलिग्राम 'सर्पिना'**

बगीच्यांतील ताज्या फुलांचा मोहक
सुगंध पसरविणारें

# अत्तर लव्ह

वापरून दररोज सुगंधाची मजा लूटा

**गजानन जनार्दन बोडस अत्तरवाले**

ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २




# कुमुद प्रकाशन

## ले. सौ. इंदिरा तेलंग

**भावनेच्या छटा** कथासंग्रह }
**भावनातरंग** कवितासंग्रह } शिल्लक नाहीं.

**वाढदिवसाची भेट** लोककथासंग्रह

बालवाचकांसाठीं

**सचित्र किं. १२ आणे**

थोड्याच प्रती शिल्लक

## आगामी

ले. **श्री. बा. य. शेटगिरी**

**'सबारिन'** लघुकथासंग्रह

डिसेंबरच्या १ तारखेस प्रसिद्ध होईल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८०७८
दा. क्र.

पत्ता.

## कुमुद आणि मंडळी

२ ए रमाप्रसाद, दादीसेठ रोड, चौपाटी–मुंबई. ७

REFBK-0008078
REFBK-0008078

## अद्यावत् फॅशनचें

# कापड

खास सूत वापरल्यामुळें आमचें कापड जास्त टिकाऊ बनलें आहे.

आमचा खास माल

* साड्या
* वायल्स
* पॉप्लिन
* हात रुमाल
* शर्टिंग

वगैरे

आमच्या आधुनिक स्पिनिंग व वीव्हिंग योजनेमुळें आमच्या डिझाईनांची मोहकता व आकर्षण वाढण्याची पूर्ण खात्री आहे

आणि

आमच्या फिनिशिंग पद्धतीमुळें आमच्या कापडाचें मखमली सौंदर्य एकाच दृष्टीक्षेपांत मनांत भरतें.

# जयभारत मिल्स्

व

# ज्युपिटर मिल्स्

अहमदाबाद.



चैम्पियन
हर एककी
पसन्द....
गुजरात
इण्डस्ट्रीज
गोरगांव, बम्बई
सब जगह मिलती है